# देगलूर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिकविणार कोटयाचे शिक्षक



देगलूर (वार्ताहर) – अलिकडच्या काळात ग्रामीण भागातून एमबीबीएस, जेईई व इतर स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी राज्यस्थान राज्यातील कोटा, हैद्राबाद, पणे व नांदेड येथे विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड वाआहे.

सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना राज्यस्थानमधील कोटा, हैद्राबाद, पुणे अथवा नांदेड यासारख्या महानगरात जाऊन खाजगी शिक्षण घेणे शक्य होत नाही. अशा सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना त्या दर्जाचे शिक्षण देगलूर महाविद्यालयात प्राप्त व्हावे, या उद्देशाने कोटा, राज्यस्थान येथिल जे.पी. चंद्रा (कोर्स समन्वयक) आणि अडत व्यापारी शिक्षण संस्था यांच्यात करार करण्यात आला आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी स्पर्धात्मक परीक्षा जेईई, नीट आणि एमएच-सीईटीचे वर्ग देगलूर महाविद्यालयात सुरू करण्यात येनार आहेत. ही बॅच ११ वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी (क्रॅश कोर्स) जून-२०२४ पासून सुरू होणार आहे. राजस्थान कोटा येथील जोखम प्रसाद (जे.पी. चंद्रा) यांची भौतिकशास्त्र विषयासह वर्ग चालविण्यासाठी मुख्य समन्वयक म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत.

दि. १३ मे रोजी जे.पी. चंद्रा यांनी रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित या विषयांसाठी तज्ज्ञ शिक्षक उपलब्ध केले आहेत. जेईई, नीट आणि एमएच-सीईटी इत्यादी अभ्यासक्रमांचे शिक्षण आता देगलूर महाविद्यालयातच प्राप्त होणार आहे. प्रस्तुत क्लासेसचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कोर्स समन्वयक डॉ. व्यंकटेश शेरीकर यांनी केले आहे.

Scanned with OKEN Scanner